# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०९/०८/२०२२ (मंगळवार)

---

.

## जबरी चोरी करणा—याविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन बेला** :— अंतर्गत मौजा सिर्सी ते महालगाव रोडवर २७ किमी पुर्व, येथे दिनांक ०७/०८/२२ चे २०/०० वा. ते २०/३० वा. दरम्यान, फिर्यादी हा त्याचा मित्र अतुल अशोक बुधे यांचे सह त्यांचे मामाची मोटर सायकल स्पलेंडर क्र एम एच ४० एम ३७७ ने सिर्सी कडुन महालगावाकडे जेवन करण्याकरिता जात असता सिर्सी चे समोर बाथरूम करनेकरीता थांबले असता मागुन येणा—या चारचाकी वाहनातील अज्ञात चार ईसमांनी गाडी थांबवुन, गाडीतुन खाली उतरून, फिर्यादी व त्याचे मित्राला हातभुक्क्याने मारहान करून फिर्यादी कडील १) एक ॲप्पल आयफोन मोबाईल जुना वापरता किमत १०,०००/—रू २)एक ओप्पो कंपनीचा जुना वापरता मोबाईल किमती किमती ३,०००/—रू ३) नगदी १२,५००/—रू ४) एक मोटर सायकल क्र एम एच ४० एम ३७७ किमती २२,०००/—रू असा एकुन ४७,५००/—रू चा माल संगणमत करून हिसकावुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रतिक शत्रुघण बावने वय २७ वर्ष रा. साखरा पोस्ट कोरा तह समुद्रपुर जि वर्धा यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बेला येथे अनोळखी चारही आरोपीविरूध्द कलम ३९४,३४ भा.दवि. अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोलीस उपनिरीक्षक ठेंगणे पो स्टे बेला मो.न ७९७२८१२५६९ हे करीत आहे.

## अवैधरित्या जनावरांची वाहतुक करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

**पोलीस स्टेशन खापा** :—अंतर्गत मौजा बडेगाव शिवार १० किमी उत्तर. दिनांक दि.०८/०८/२२ चे ०८/३० वा वा दरम्यान, यातील आरोपी नामे— एम.एच.—४०—सीडी—६०९८ बुलेरो पिकपचा चालकाने महाराष्ट्र राज्यात गोवंशाची कत्तली करिता मनाई असताना सुध्दा आपले ताब्यातील महेन्द्रा बोलेरो मालवाहु वाहन क्रं एम एच ४० सि.डी. ६०९८ मध्ये ०५ म्हशी अंत्यत निर्दयेतेने कोबुन व क्रुरतेने गोवंशाला आकुड दोरीने पाय बाधुन कत्तली करिता घेउन जात असताना मिळुन आल्याने ०५ गोवंश व वाहतुकी करीता वापरात आणलेली वाहन असा एकुन ३,५०,०००/— रू. चा माल जप्त केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— हर्शल प्रदिप मोहटे रा.डोंगेघाट खापा येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ११ (१)(बी)(डी)(एच) प्राण्याचा छळ प्रति.अधि.सह कलम ५ अ(१) ९ महा.पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पोउपनि कलेगुरवार रा. पो स्टे खापा मो नं ९१७५५७९१४३ हे करीत आहे.

## चोरी

**पोलीस स्टेशन बेला** :— अंतर्गत बेला २ किमी पुर्व, यातील फिर्यादी ही आपले परिवारासह बाहेरगावी गेली असता, कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दरवाज्याचे कडी ला लावलेले नट खोलुन आत प्रवेश करून बेडरुम मध्ये ठेवलेली आलमारी मधील सोन्याचे दागिने व नगदी १०,०००/—रू असा एकुन ६२,५००/—रू माल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ उषा सुधाकर शहाणे वय ४५ वर्षे रा पांडे ले—आउट बेला यांचे रिपोर्टवरून पोस्टे बेला येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४, ४५७,३८० भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक ठेंगणे पोस्टे बेला मोन ७९७२८१२५६९ करीत आहे.

## लोखंडी रॉडने जखमी करणा—यास अटक

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— अंतर्गत मौजा बिनां संगम दक्षिण ५ किमी, दिनांक ०८/०८/२२ चे १७/०० वा दरम्यान, यातील जख्मी फिर्यादी हे गावातील चौकातुन चहा पिउन आपले घरी परत जात असता, यातील आरोपी नामे — कमलेश अंनदराव मेश्राम वय २८ वर्ष रा. वार्ड न ३ बिना संगम याने जुने वादाचे कारणावरून लोखंडी रॉडने फिर्यादीचा हातावर मारून जख्मी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अंकुश सुरेश चवरे वय २९ वर्ष रा. वार्ड नं. ३ बिना संगम ता. कामठी यांचे रिपोर्टवरून पोस्टे खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम ३२४ भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली. पुढील तपास पो.ना दिपक रेवतकर मो.न. ९५४५५२३७३६ करीत आहे.

## विषारी औषध प्राशन केल्याने मृत्यु

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा वार्ड क्र १२, मोहपा १४ किमी पश्चिम, यातील मृतक नामे— मनोज लक्ष्मन यावलकर वय ३३ वर्ष रा. वार्ड क्र १२ मोहपा यांनी दिनांक. ०६/०८/२२ चे दुपारी १३/०० वा आपल्या घरी अज्ञात कारणाने कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्याची प्रकृती खराब झाल्याने उपचारकामी प्राथमीक आरोग्य केद्र मोहपा येथे नेले, असता तेथुन मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोस्टे कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास स.फौ लक्ष्मण रूडे मो नं ९९२३३५२६४६ करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**